**"स्वच्छ विद्यालय स्वच्छ महाराष्ट्र"**
**<u>मोहिम व कार्यक्रमाची अंमलबजावणी</u>**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
### शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२७७/एस.डी.४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०७ ऑक्टोबर, २०१५

**<u>प्रस्तावना -</u>**

भारत सरकारने दिनांक २ आक्टोंबर २०१४ पासून संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात केली आहे. मा. पंतप्रधानांनी स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय असे आवाहन सर्व भारतीय जनतेसे केले आहे. तसेच दिनांक १ ते ३१ आक्टोंबर २०१५ हा कालावधी स्वच्छता मोहिम म्हणून केंद्र शासनाने घोषित केला आहे.

२. विद्यार्थ्यांना निरोगी जीवन जगता यावे हा शिक्षणाचा मूलभूत उद्देश आहे. यासाठी आरोग्याच्या दृष्टीने पुढील तीन पायऱ्या अत्यंत महत्वाच्या आहेत.

१. पहिली **पायरी :-** जेवणाआधी व शौचास जाऊन आल्यानंतर योग्य पध्दतीने साबणाने हात स्वच्छ धुणे.

२. दुसरी **पायरी :-** संपूर्ण शरीर स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टीने २४ तासातून किमान एकदा स्वच्छ आंघोळ करणे.

३. तिसरी **पायरी :-** आपण राहत असलेले ठिकाण (घर व शाळा) व परिसर स्वच्छ ठेवणे.

३. देशाच्या स्वातंत्र्याला ६८ वर्षे निघून गेल्यानंतरसुध्दा ही मोहिम घ्यावी लागत आहे यावरून देशाचे शिक्षण स्वत:च्या मुलभूत उद्देश प्राप्तीमध्ये असफल झालेले आहे, हे दु:खाने म्हणावे लागत आहे. याच जगामध्ये एक सुध्दा डास किंवा माशी नसलेले देश आहेत. याच जगामध्ये जेवण आणि हाताचा थेट संबंध न येऊ देता जेवणारे देश आहेत. तेथे जेवणासाठी चमचे, सुरी आणि काटे याचा उपयोग करतात. कुत्र्यांनासुध्दा शौचालय स्वच्छतेचे धडे (Toilet Manners) शिकविणारे देश आहेत. त्या देशांना हे सगळे शक्य झाले आहे तर आमच्या देशालाही हे शक्य आहे असे मानावे लागेल.

४. अभ्यासक्रम व पाठयक्रमामध्ये स्वच्छता शिक्षण आहेच. यापूर्वीसुध्दा स्वच्छता मोहिम राबविली गेली आहे, मात्र यश प्राप्त झाले नाही. या अपयशाला काहीतरी कारण असेल. शिक्षणाचा अजून एक महत्वाचा उद्देश **"वर्तन परिवर्तन"** आहे. आपण अभ्यासक्रमात शाळेत विद्यार्थ्यांसोबत जे काही करतो त्याने "वर्तन परिवर्तन" होत नाही, हे या अपयशाचे कारण आहे असे वाटते. शाळेत जर "वर्तन परिवर्तन" झालेच तर घरी किंवा समाजात ते दिसत नाही. "वर्तन परिवर्तन" टिकून न रहाण्याचे कारण "स्वच्छतेची आवश्यकता न पटणे" एवढेच असू शकते. अजून एक वाक्प्रचार वापरला जातो, "कळते पण वळत नाही" त्याचे कारण समाजात तसे वातावरण नाही किंवा सोयी उपलब्ध नाहीत. जेवणापूर्वी हात धुवायचे असतात हे कळते, त्याप्रमाणे मूल घरी तसे करते, परंतु शाळेत तशी सुविधा नाही म्हणून माध्यान्ह भोजनापूर्वी त्यांना हात धूता येत नाहीत. सुविधा उपलब्ध असलीच तर प्रत्येक मुलाला योग्य पध्दतीने हात धुऊन, भोजन करून, वेळेत वर्गात जाता येईल एवढया प्रमाणावर सुविधा उपलब्ध नाही. काही वेळा हात धुण्याच्या सुविधेमुळे शाळेच्या परिसरात चिखल निर्माण होताना दिसतो. याचप्रमाणे शौचालयाची व्यवस्था व त्याची निगा यामध्ये अडचणी आहेत. तसेच शाळेत क चरा टोपली ठेवली नसल्याने मुलांना कचरा कुठे टाकावा हा प्रश्न निर्माण होतो.

५. वरील प्रकारची त्रोटक व्यवस्था ठेवून शाळा चालल्या तर मुले स्वच्छतेचे धडे शिकणार नाहीत. शाळेत सगळी सोय झाली तर मुले शाळेत स्वच्छतेने वागू शकतील. मात्र शाळेत सवय लागली आणि गावात / शहरात तशी सोय नसल्यास तेथे स्वच्छतेने वागणे पुन्हा अवघड होऊन बसेल. शिक्षण विभागाने आपले काम पूर्ण करावे. शाळांमध्ये स्वच्छतेच्या बाबी शिकवून ते तसे वागतील इथपर्यंत शाळेची जबाबदारी आहे. शाळेच्या बाहेर सुध्दा मुलांच्या आवाक्यात आहे तेवढे वागणे स्वच्छतेच्या शिक्षणाप्रमाणे असावे. जसे जेवणापूर्वी आणि शौचाला जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे तसेच त्यांनी खाल्लेल्या पदार्थाचे Wrapper वगैरे स्वतःच्या खिशात ठेवून नंतर कचरा जेथे टाकला जातो तेथे टाकणे. शौच व मुतारीसाठी शौचालयाचाच वापर करणे. तसेच बाहेर न थुंकणे एवढया बाबी मुलांच्या आवाक्यात आहेत असे वाटते. लहानपणी मुलांना एवढया स्वच्छतेच्या सवयी लागल्यास मोठे होऊन हे नियम ते मोडणार नाहीत. मागील काळात मुलांना आपण या पध्दतीने शिकविले नाही म्हणून सध्याची ही मोहिम व कार्यक्रम राबवावे लागत आहेत.

६. तसेच अनेक मोहिमा राबवून अनेकदा अपेक्षित यश मिळत नाही. त्यामुळे यापुढे मोहिम राबवावी लागणार नाही या बेताने ही मोहिम व कार्यक्रम आखले जात आहे. सुरूवातीचा एक महिना (दि. १ ते ३१ ऑक्टोंबर) मोहिम राबविली जाईल. त्यानंतर दि. १ नोव्हेंबर पासून कार्यक्रमात

परिवर्तन होईल. हे सर्व नियमित शिक्षणाच्या वेळेत कोणतेही बदल न करता केले जाणार आहे. मोहिमेतंर्गत कला, कार्यानुभव आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण या तीनही विषयांचे सर्व तास स्वच्छतेसाठी वापरावयाचे आहेत. मोहिम संपल्यानंतर दर आठवडयाला कार्यानुभवाचा एक तास यासाठी वापरावयाचा आहे. जोपर्यंत महाराष्ट्र व पर्यायाने भारत देश वर उल्लेखिलेल्या देशांसारखे होणार नाहीत तोपर्यंत हा कार्यक्रम चालणार आहे. जर पुढील वर्षी सुध्दा भारत सरकारने मोहिम राबविली तर काय होईल? वरीलप्रमाणे उद्दिष्ट गाठले नसल्यास पुन्हा मोहिम राबवावी लागेल. **परंतू, ज्या शाळांनी वरील उद्दिष्ट गाठले असतील त्यांना पुन्हा मोहिम राबवावी लागणार नाही.** ही मोहिम व कार्यक्रम कोणत्याही विषय शिक्षणाला बाधा पोहोचणार नाही या पध्दतीने आखली गेली आहे. त्यामुळे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णयामध्ये मोहिमांना आळा असा जो उद्देश ठेवण्यात आला आहे तो उद्देश अबाधित ठेवण्यात आला आहे. त्यामुळे अप्रगत विद्यार्थी विहिन महाराष्ट्र कार्यक्रम राबवता-राबवता हे कार्यक्रम राबवावयाचे आहेत.

७. वरील विवेचनाप्रमाणे आरोग्यदायी, स्वमूल्यमापनाची सोय असलेली व कायम टिकणारी "स्वच्छ विद्यालय - स्वच्छ महाराष्ट्र" मोहिम व कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

१. शालेय विद्यार्थ्यांना आरोग्य संपन्न जीवनाचा लाभ होवून त्यांना सर्व रोगांपासून मुक्त अशा निरामय आणि आनंदी जीवनाचा लाभ, यासाठी काही आरोग्यदायी सवयीचा संस्कार मुलांवर व्हावा यासाठी **दि. १ ते ३१ ऑक्टोंबर पर्यंत "स्वच्छ विद्यालय - स्वच्छ महाराष्ट्र" मोहिम कार्यान्वित करण्यात येत आहे.**

२. स्वच्छ विद्यालय स्वच्छ महाराष्ट्र मोहिम व कार्यक्रमात गाठावयाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे राहतील.

१) प्रत्येक मुलास हात धुण्याच्या ७ पायऱ्या शिकवून (योग्य पध्दत)प्रत्येकवेळी त्याप्रमाणे हात धुण्याची सवय लावणे.

२) जेवणापूर्वी योग्य पध्दतीने हात धुण्याची सवय लावणे.

३) प्रत्येकवेळा शौचास जाऊन आल्यानंतर योग्य पध्दतीने हात धुण्याची सवय लावणे.

४) प्रत्येक मुलगा व मुलगी यांना फक्त शौचालयातच शौचास जाण्याची सवय लावणे. कोणतेही शाळकरी मूल उघडयावर शौचास बसणार नाही अशी परिस्थिती निर्माण करणे.

५) प्रत्येक मूलास दररोज स्वच्छ आंघोळ करण्याची सवय लावणे.

६) प्रत्येक मुलांना केर-कचरा (पाकिटे, कागद, Wrapper वगैरे) फक्त कचरा कुंडीत (शाळेच्या किंवा घराच्या) टाकण्याची सवय लावणे.

७) प्रत्येक मूलास स्वच्छ धूतलेले कपडे (साबणाने धुतल्यावर तीन दिवसापेक्षा अधिक न वापरणे) परिधान करण्याची सवय लावणे.

८) प्रत्येक मूलास आपल्या वर्गात बसण्याची जागा, वर्ग व शाळा स्वच्छ ठेवण्याची सवय लावणे.

९) प्रत्येक मूलाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टिने प्रयत्नशील राहून कार्य करणे.

१०) परिसर स्वच्छ ठेवताना तो सुंदर दिसेल याची काळजी घेणे.

**३.** शासन हे गृहीत धरते की, राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षण विभागातील सर्व अधिकाऱ्यांना वर नमूद केलेल्या सर्व १० सवयी असतीलच. चुकून एखाद्या कोणाला यातली एखादी सवय नसल्यास ती त्वरीत विकसित करावी. अन्यथा आपल्या कार्यक्षेत्रात हा कार्यक्रम अपयशी ठरेल याची हमी आहे. त्यानुषंगाने आपण सर्वांनी कृपया, महात्मा गांधीजीनी एका मुलाला गूळ खाण्याचे तोटे सुचविण्यापूर्वी स्वत: बदललेली सवय आठवावी.

४. <u>उद्दिष्टे गाठण्यासाठी करावयाच्या कृती :-</u>

**४.१) हात धुणे** : या एका साध्या वाटणाऱ्या गोष्टीचा विचार केला तरी त्यामध्ये अनेक गोष्टी लपलेल्या आहेत. आपल्या देशामध्ये संसर्गजन्य रोगांचे प्रमाण खूप जास्त आहे. डायरिया (हागवण) सारख्या आजारामुळे दवाखान्यात भरती होणाऱ्या मुला-मंलींचे प्रमाण मोठया संख्येने आहे. भारतात दररोज हजारो बालके डायरियामुळे मृत्यू पावतात. तथापि, संशोधन आणि विविध अभ्यासानंतर असे निदर्शनास आले आहे की, साबणाने व योग्य पध्दतीने हात धुतल्याने डायरिया सारख्या आजाराचे प्रमाण मोठया प्रमाणात कमी होऊ शकते. पर्यायाने विद्यार्थ्यांची शाळेतील अनुपस्थिती (गैरहजेरी) कमी होईल.

युनिसेफ तर्फे योग्य पध्दतीने (७ पायऱ्या वापरुन) हात कसे धुवावेत या संदर्भात प्रभावीपणे मार्गदर्शन करण्यात येते. युनिसेफमार्फत या बाबतचा व्हिडिओ तयार करण्यात आलेला आहे. सदर व्हिडीओ https://youtube/OohBYyExW2w या लिंक वर उपलब्ध आहे.

युनिसेफ तर्फे राज्यातील काही जिल्हयांमध्ये **उदा.** जालना मध्ये हॅण्डवॉश स्टेशन्स उभी करण्यात आली आहेत. ती अत्यंत सहज, सोपी, कमी खर्चाची व कमी वेळात जास्तीत जास्त विद्यार्थी हात धुऊ शकतील अशा स्वरूपाची आहेत. अशी हॅण्डवॉश स्टेशन्स शाळांमध्ये उभारणे शक्य आहे. स्वच्छ हात धुण्याकरिता सात भागात (Seven Steps Of Hand Washing) हात धुतल्यास अनेक रोगराईपासून विशेषत: डायरिया पासून मुक्ती मिळू शकते असे संशोधनाअंती सिध्द झालेले आहे. यावरुन हात धुणे या संस्काराचे महत्व आपल्या लक्षात येते व त्याकरिता विद्यार्थ्यांना खालील सवयी लावणे आवश्यक आहे.

४.१.१) जेवणाअगोदर साबणाने योग्य पध्दतीने हात स्वच्छ धुवावेत. मात्र साबण नसेल तेथे हात धुण्याचा काही उपयोग नाही. त्यामुळे स्वच्छ पाण्याने (बिगर साबनाने) हात धुतले असल्यास ते धुतलेले आहे असे मानू नये. अशा परिस्थितीत चमच्याने जेवण करावे. घरात सुध्दा तसेच करावे. भाकरी किंवा पोळी चमच्याने खाणे अवघड होईल तेव्हा हाताच्या बोटांचा कमीत कमी भाग भाकरी किंवा पोळीच्या संसर्गात येईल या पध्दतीने ते खावे. भात, डाळ आणि भाजी खाण्यासाठी फक्त चमच्याचाच उपयोग करावा.

४.१.२.) हात स्वच्छ धुतल्यानंतर तो पुसण्यासाठी सार्वजनिक टॉवेलचा वापर करण्यात येऊ नये. स्वत:चा रुमाल नॅपकीन वापरल्यास तो स्वच्छ असला पाहिजे.

४.१.३) स्वच्छ रुमाल उपलब्ध नसेल तर एक दोन मिनिटे हवेतच हातांची हालचाल करुन हात आपोआप कोरडे झाल्यानंतर अन्नाला हात लावावा. हात शर्टला पुसणे तसेच खिशात घालून कोरडा करणे हे धोक्याचे आहे. कारण खिशात धुळीच्या रुपात घाण असते. त्यामार्फतसुध्दा रोगजंतूचा संसर्ग होण्याची शक्यता असते.

४.१.४) शौचाला जाऊन आल्यावर आपले हात साबण लावून योग्य पध्दतीने स्वच्छ धुवावेत.

४.१.५) घरामध्ये अथवा बाहेर आपण अनेक वस्तू हाताळत असतो जसे पुस्तक, वहया, फाईल्स स्वीच, मोबाईल, टेलीफोन व कॉम्प्युटरचे किबोर्ड आणि त्यामुळे जंतूसंसर्ग होण्याची शक्यता असते. परंतु त्यापेक्षा अधिक आपला हात उत्सर्जन अंग म्हणून काम करत असल्यामुळे हात स्वच्छ धुण्याची आवश्यकता असते.

४.१.६) आजकाल फॅशन म्हणून हाताची नखे वाढविण्याची प्रथा आहे. पण हाताच्या बोटांची नखे काढली नाहीत तर नखांमध्ये मळ साचून वेगवेगळया प्रकारचे जंतू नखात राहतात व तेही धोक्याचे असते त्यामुळे स्वच्छ हात धुणे अत्यंत आवश्यक आहे.

## ४.२) <u>स्वच्छ आंघोळ करणे :-</u>

स्वच्छ अंघोळ न केल्यास शरीराची दुर्गंधी येते. आंघोळ न केल्यास शरीराचे तापमान नियमित ठेवण्याच्या हेतूने अधिक घाम सुटतो, त्याने शरीर अधिक घाण होते. खाज, खरुज नायटा यासारखे त्वचारोग होऊ शकतात. आंघोळ करताना कान, नाक, डोळे, हात, पाय, नखे, केस या सर्वांची स्वच्छता होणे आवश्यक असते. शाळेत येताना वर्गातील मुले स्वच्छ आंघोळ करुन येतील याबाबत मुलांमध्ये जागृती येईल याची काळजी शिक्षकांनी घ्यावी.

## ४.३) <u>स्वच्छ कपडे परिधान करणे :-</u>

अस्वच्छ कपडे घातल्याने त्वचारोग होऊ शकतात. तसेच कपडयांची दुर्गंधी येत असते. तसेच मळकट कपडे दिसायला सुध्दा छान दिसत नाही. हे विचारात घेवून विद्यार्थ्यांना स्वच्छ कपडयांचे महत्व विशद करून ते शाळेत येताना स्वच्छ कपडे घालतील व नीटनेटके येतील हे स्वच्छतेसाठी आवश्यक आहे.

## ४.४) <u>बसायची जागा, वर्ग, शाळा, स्वच्छ करणे</u> :-

शाळेचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी शाळांमध्ये कचराकुंडी ठेवणे, ओला कचरा, सुका कचरा याची माहिती विद्यार्थ्यांना देणे, बसायची जागा स्वच्छ ठेवणे, शाळेतील प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्टाफ रूम, मुख्याध्यापक कक्ष यामध्ये देखील स्वच्छता व नीटनेटकेपणा असणे गरजेचे आहे.

४.५) <u>घर, परिसर स्वच्छ ठेवणे</u> :-

**शाळेमध्ये विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार केल्यास पर्यायाने घर, परिसर स्वच्छ ठेवण्याबद्दलचे मार्गदर्शन विद्यार्थीच करू शकतील. पर्यायाने स्वच्छ गाव, स्वच्छ शहर, स्वच्छ राज्य व स्वच्छ देश हे ध्येय गाठणे शक्य होईल.**

४.६) **स्वच्छता** ही सवय विद्यार्थ्यामध्ये रूजविण्यासाठी विविध उपक्रम शाळांनी आयोजित करणे आवश्यक आहे. उदाहरणादाखल काही **उपक्रम परिशिष्ट "ब"** मध्ये नमूद करण्यात आले आहेत.

४.७) <u>सर्व शिक्षा अभियान मध्ये मंजूर तरतूद</u> :-

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सन २०१५-१६ मध्ये नवोपक्रम या लेखाशिर्षाखाली प्रति जिल्हा रू. ५.०० लाख इतकी तरतूद स्वच्छ विद्यालय मोहिमेतंर्गत स्वच्छतेचे उपक्रम राबविण्याकरिता मंजूर करण्यात आलेली आहे.

या तरतूदीचा उपयोग या मोहिम व कार्यक्रमाची प्रसिध्दी, बक्षिसे व बक्षीस वितरण समारंभाकरिता करण्यात यावा. बक्षीसासाठी एक मात्र निकष शाळेतील सर्व मुलांना दहा मिनिटांचे आत सात पाय-या वापरुन हात धुणे शक्य होईल असे "हॅण्ड वॉश स्टेशन" उभारणे हे ठेवण्यात यावे. जी शाळा हे काम पूर्ण करेल त्या शाळेतील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व मुख्याध्यापक यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात यावा.

४.८) प्रस्तावनेत स्पष्ट केल्यानुसार दि. १ ते ३१ आक्टोंबर, २०१५ या कालावधीमध्ये विशेष बाब म्हणून स्वच्छतेबाबतची जनजागृती होण्याकरिता शाळांमधून या महिन्यातील कला, कार्यानुभव आणि आरोग्य व शारीरिक शिक्षण यासाठी उपलब्ध सर्व तासिकांचा वापर स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याकरिता करण्यात यावा. **मोहिम संपल्यानंतर दर आठवडयाला प्रत्येक वर्गासाठी कार्यानुभवाचा एक तास स्वच्छता कार्यक्रमाकरिता वापरण्यात यावी.**

यासाठी युनिसेफद्वारे तयार करण्यात आलेल्या १२ तासिकांचे उपक्रम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील त्याचाही वापर करावा. **गणित, भाषा व इतर विषयांसाठी स्वच्छतेशी निगडीत**

**आकर्षक उपक्रम तयार करून वेळोवेळी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संकेत स्थळावर अपलोड करण्यात येईल.**

ज्या जिल्हयामंध्ये प्रथम टप्प्यात (मार्च २०१६ अखेर) ५०० शाळा किंवा त्यापेक्षा अधिक अशा "हॅण्ड वॉश स्टेशन" उभारणी करतील त्या जिल्हयांचा विशेष सत्कार शासन स्तरावरून करण्यात येईल. तसेच एकदा ५०० शाळा पूर्ण झाल्यानंतर नवीन ५०० शाळांसाठी विशेष अभियान घेऊन जे जिल्हे अशाप्रकारे सर्व शाळांमध्ये "हॅण्ड वॉश स्टेशन्सची" उभारणी करतील अशा जिल्हयांचा शासन स्तरावरुन विशेष सत्कार करण्यात येईल.

त्यासाठी प्रतिशाळा निकष रू. १०००/- ठरविण्यात येत आहे. हा निकष विचारात घेता जिल्हयातील ५०० शाळांनी हॅण्ड वाशिंग स्टेशन उभारले तर त्यासाठी रु. ५ लाख तरतूद लागेल. "हॅण्ड वॉश स्टेशन" उभारणीचा खर्च रू. १०,०००/- ते १५,०००/- प्रति शाळा येतो. युनिसेफने जालना जिल्हयातील १०० शाळांमध्ये हा प्रयोग करून पाहिला आहे. वरील परिच्छेद १ मध्ये उल्लेखिलेल्या व्हिडिओ मध्ये याचे काही नमुने पाहावयास मिळतील. अधिक नमूने व अधिकची तांत्रिक माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई कार्यालयातील अभियंत्यामार्फत पुरवावी. यासाठी लागणारा सर्व निधी लोक सहभाग व CSR मधून उपलब्ध करावयाचा आहे. राज्यात डिजिटल शाळा करण्यासाठी मोठया प्रमाणावर लोकसहभाग विशेष करून शाळेच्या माजी विद्यार्थ्यांकडून (Alumni) मिळविण्यात येत आहे. त्यासाठी रू. ६०,०००/- ते रू. १,००,०००/- रक्कम लागते. त्या तुलनेत "हॅण्ड वॉश स्टेशन" साठी लागणारी रक्कम कमी आहे. त्यामुळे लोक सहभाग किंवा CSR च्या माध्यमातून हे काम मोठया संख्येने शाळेत होईल अशी आशा आहे.

ज्या शाळेत उपरोक्त प्रमाणे निधी उपलब्ध होणार नाही त्या शाळांनी सुध्दा हात धुण्याची अशी व्यवस्था करावी, जेणेरून पाणी वाहून चिखल आणि पर्यायाने डासांना आमंत्रण होणार नाही. "हॅण्ड वॉशिंग स्टेशन" केले तरी सांड पाण्याच्या निचऱ्यासाठी शोषखड्डा किंवा परसबाग करावी लागणार आहे. पाणी कमी उपलब्ध असलेल्या गावांनी शोषखड्डा अशा पध्दतीने बांधावा जेणेकरून पाणी फिल्टर होऊन एका ठिकाणी साचेल. या पाण्याचा उपयोग शौचालयात फ्लश करण्यासाठी वापर करता येईल.

**हॅण्ड वॉशिंग स्टेशनची गरज का ?**

मुलांना माध्यान्ह भोजनासाठी सुट्टीची वेळ ठरलेली असते. समजा, ती वेळ ४० मिनिटे आहे. एका मुलास योग्य पध्दतीने सात पायऱ्या वापरून हात धुवायला ४० ते ६० सेकंद वेळ लागतो. शाळेत हात धुण्यासाठी एकच नळ असेल आणि ६० मुले असतील तर हात धुण्यासाठी ४० ते ६० मिनिटे लागतील. अशा परिस्थितीत, एकतर भोजनाच्या सुट्टीची वेळ वाढवावी लागेल (त्याने शिक्षणासाठी उपलब्ध वेळ कमी होईल) किंवा योग्य पध्दतीने हात धुतले जाणार नाहीत. तेव्हा एकतर प्रत्येक मुलाला योग्य पध्दतीने हात धुण्यास लागणारा वेळ कमी करता येईल किंवा नळाच्या तोटीची संख्या वाढवता येईल. युनिसेफने जालना जिल्हयात १०० शाळेत केलेल्या कामाप्रमाणे प्रशिक्षण दिल्यास प्रत्येक मुलाला लागणारा वेळ १५ ते २० सेकंदापर्यंत कमी करता येतो आणि समजा, शाळेनी ठरविले की सर्व मुलांचे योग्य पध्दतीने हात धुवून १० मिनिटात व्हायला पाहिजेत तर ३० मुलांसाठी एकच नळाची तोटी पूरेशी आहे. परंतु कमी वेळेत हात धुण्याचे प्रशिक्षण न दिल्यास २ ते ३ नळाची तोटी बसवावी लागेल. तसेच शाळेत ६०० मुले असल्यास व मुलांना कमी वेळेत हात धुण्याचे प्रशिक्षण दिल्यास २० तोटया बसवाव्या लागतील, आणि प्रशिक्षण न दिल्यास ४० ते ६० तोटया बसवाव्या लागतील. सध्या बऱ्याच शाळांमध्ये अशाप्रकारे वैज्ञानिक पध्दतीने गणना करून तोटया बसवल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे हॅण्ड वाशिंग स्टेशन बसवण्याची गरज आहे. नळाच्या तोटयाची मांडणी एका लाईनीत, वर्तुळात, वर्गाकार किंवा अन्य पॅटर्न मध्ये करता येते. शाळेत जागेची उपलब्धता आणि दिसायला छान वाटणारे पॅटर्न या दोन्हीचा विचार करून आपल्या शाळेत कोणता पॅटर्न बसवणार हे ठरविण्यात यावेत.

४.९) **मोहिमेचा प्रचार, प्रसार, जनजागृती, प्रसिध्दी :-**

ही मोहिम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रत्येक गावातून/वॉर्डामधून जनजागृतीच्या दृष्टिने दवंडी देण्यात यावी. प्रभात फेरीचे आयोजन करण्यात यावे. शाळेच्या / ग्रामपंचायत फलकावर स्वच्छता मोहिमेची माहिती प्रसिध्द करावी.

ग्राम सभेच्या बैठकीमध्ये या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीबाबत व स्वच्छतेची सवय रुजविण्यासाठी चर्चा करण्यात यावी.  यामध्ये सर्व लोकांना सहभागी होण्याबाबत आवाहन करण्यात यावे.

शाळा व्यवस्थापन समितीच्या दरमहा च्या बैठकीमध्ये या मोहिमेची परिणामकारकता व उपयोगिता याबाबत चर्चा घडवून आणावी. सर्व पालकांमध्ये या मोहिमेच्या माध्यमातून स्वच्छतेबाबत जागृती निर्माण करून वर नमूद केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांना प्रेरित करावे.शाळा शैक्षणिक विकास आराखडा तयार करताना स्वच्छतेबाबतचे आवश्यक घटक त्यामध्ये समाविष्ट करावेत.

स्वच्छतेची सवय शिक्षणामधून रूजविण्यास शालेय शिक्षण विभागाने पुढाकार घेतला आहे. यामध्ये समाजातील सर्व घटक, स्वयंसेवी संस्था, शासकीय यत्रंणा, विविध विभाग, प्रतिष्ठीत व्यक्ति, CSR इत्यादींचा सक्रीय सहभाग महत्वाचा आहे. यामधूनच स्वच्छ भारत या संकल्पनेची उद्दिष्टपूर्तीहोणार आहे.

४.१०) <u>**शौचालयाचा वापर**</u> :-

राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलां व मुलींसाठी वेग-वेगळे प्रत्येकी किमान एक शौचालय बांधण्यात आले आहेत. पुढील काळात खालील बाबींची काळजी घ्यावयाची आहे. मुले व मुलींची संख्या अधिक असल्यास आर्किटेक्चर असोसिएशनच्या मापदंडाप्रमाणे अधिक संख्येने शौचालय बांधणे. जेणेकरून दिलेल्या वेळेत सर्व मुले - मुलींना शौचालयाचा वापर करून वर्गात परत येता येईल.

सर्व शौचालय नियमितपणे वापरास योग्य राहतील अशापध्दतीने त्याची निगा ठेवावी. सर्व मुले/मुली फक्त आणि फक्त शौचालयाचाच उपयोग करतील याची काळजी घ्यावी.

राज्यात बहुतांश भागात पर्जन्यमान कमी असल्यामुळे नेहमी पाण्याची टंचाई असते. "पिण्यासाठी नाही तर शौचालयाच्या फ्लशसाठी पाणी कुठुन आणणार" असे भावनिक वाक्य बऱ्याच वेळा ऐकायला मिळते. अशा परिस्थितीत पाण्याशिवाय वापरले जाणारे शौचालय बांधावे लागतील. अजूनपर्यंत असा विचार करून शौचालय बांधले गेलेले नाहीत. बाजारात Bio Toilets चे काही प्रकार उपलब्ध झाले आहेत. पाण्याची कमतरता असलेल्या काही

शाळांनी याप्रकारचे शौचालय लोकसहभाग किंवा CSR च्या माध्यमातून बसवून राज्यात असे काम करणारे पहिलेच याचे मानकरी व्हावे.

तसेच कमी पाणी असतांना सध्याचे शौचालय सुस्थितीत ठेवण्यासाठी नव-नवीन कल्पना विकसित करण्याची आवश्यकता आहे. याचा यावर्षी राबवावयाच्या मोहिमेसाठी महिना (दि. १ ते ३१ आक्टोंबर, २०१५) उपयोग करण्यात यावा. महिन्याच्या शेवटी या कल्पना एकत्र करून पुस्तिका तयार करण्यात येईल. अशा नवीन कल्पना देणाऱ्या शाळांचा त्यात विशेष नामोल्लेख करण्यात येईल.

**हात (शरीर) घाण कसा होतो ?**

आपणास सगळयांना जगायची इच्छा असते. त्यासाठी शरीराला ऊर्जा लागते. त्यासाठी आपण सगळेजण जेवण करतो. जेवण पोटात जाऊन पचते आणि त्याने ऊर्जा मिळते. पाचन क्रियेनंतर जेवणाचा मोठा भाग शरीराला वापरण्यायोग्य राहत नाही त्याला शरीर बाहेर काढते. ते ३ प्रकारे काढले जाते. ठोस (मल), द्रव (मूत्र व घाम) व गॅस (वायु), मल व मूत्र उर्त्सजनांसाठी शौचालयाचा वापर केला जातो आणि त्यानंतर हात घाण होतो हे आम्हाला स्पष्टरित्या कळते. घाम पूर्ण शरीराला सूटतो, तळ हाताला सुध्दा सुटतो. एखादा दिवस आंघोळ न केल्यास शरीराला दुर्गंधी यायला सुरूवात होते. परंतु शरीराच्या ज्या भागातून दुर्गंधी येत नाही तेथे घाम सुटत नाही असे नाही. ज्या घामातून दुर्गंधी येते त्यात नक्कीच असे जिवाणू असणार जे नाक किंवा तोंडावाटे शरीरात शिरल्यास आम्हाला आजारी करेल. शरीरातून दुर्गंध येऊ नये म्हणजेच नाकवाटे आपण आजारी होऊ नये म्हणून स्वच्छ आंघोळ करणे आवश्यक आहे.

तोंडवाटे हे जीवाणु शरीरात शिरु नयेत म्हणून काय करावे? तळ हाताला सुटलेल्या घामातून आलेले जिवाणु , जेवण किंवा पिण्याच्या पाणीसोबत पोटात जाऊ नयेत म्हणून जेवणापूर्वी योग्य पध्दतीने हात धुणे आवश्यक आहे. बरेच जण इतर वस्तूंना हात लागल्यामुळे घाण होतो असे म्हणतात ते बरोबर असले तरी कोणत्याही वस्तूला हात लागला नाही तरी हात घाण होतो हे वरील विवेचनावरून दिसते. हाताला घाम सुटणे हि निरंतर क्रिया आहे. अगदी जेवताना सुध्दा हाताला घाम सूटत राहतो आणि त्या काळामध्ये घामातून येणारे जिवाणू आपल्या पोटात सुध्दा जातात. एवढे जिवाणू सुध्दा पोटात जावू नये असे वाटत असल्यास फक्त चमचे, सुरी व काटयाचा वापर करून जेवण करावे. यामुळेच बऱ्याच देशांमध्ये हाताने जेवण्यास बंदी आहे.

## ५. मुल्यमापन :-

प्रत्येक शाळेने या कार्यक्रमाच्या प्रक्रिया व निष्पतीचे मूल्यमापन करावयाचे आहे. त्यासाठी कोणतेही रजिस्टर किंवा फाईल तयार करावयाची गरज नाही. ते स्वमूल्यमापनाच्या स्वरुपात राहील. आपण करीत असलेल्या कामास यश येण्याची प्रत्येकाची अपेक्षा असतेच. प्रत्येक शिक्षकाने खालील प्रमाणे मूल्यमापन करावे.

### ५.१) प्रक्रिया मूल्यमापन :-

१. प्रत्येक मूल भोजनापूर्वी (शाळेत व घरी)योग्य पध्दतीने (७ पायऱ्या वापरून) हात धूत आहे.

२. प्रत्येक मूल शाळेच्या शौचालयाचा योग्य पध्दतीने वापर करत आहे.

३. प्रत्येक मूल केरकचरा कचरा कुंडीत (शाळेत व घरी) टाकत आहे.

४. प्रत्येक मूल घरी आणि गावात शौचालयाचा वापर करत आहे.

५. प्रत्येक मूल रोज आंघोळ करत आहे.

६. प्रत्येक मूल स्वच्छ कपडे परिधान करत आहे व नीट निटके दिसत आहे.

सर्व वेळ प्रत्येक मुलावर शिक्षकाचे लक्ष राहीलच असे नाही. त्याची आवश्यकताही नाही. आठवडयातून एकदा प्रत्येक मुलाने शिक्षकाला त्यामधील राहिलेल्या फक्त उणीवा सांगावयाच्या आहेत. मुलींनी महिला शिक्षकाला उणीवा सांगाव्यात. एखाद्या शाळेत महिला शिक्षक नसल्यास गावातील काही शिकलेल्या प्रौढ महिलांची यासाठी मदत घ्यावी. प्रत्येक मुद्यावर मुलांनी खालीलप्रमाणे सांगावयाचे आहे. लिहून घ्यायचे किंवा द्यावयाचे नाही. स्वत:च्या खाजगी डायरीत ते लिहीत असतील तर छानच.

१. मागील आठवडयात सहा पैकी एक सुध्दा बाबींमध्ये माझी कोणतीही उणीव राहिली नाही.

२. असल्यास, एकूण ............ वेळा जेवले त्यातले .............. वेळा योग्य पध्दतीने हात धुतले नाही.

३. एकूण ............ वेळा शौचालयाचा वापर केला नाही.

४. एकूण ............ वेळा कचराकुंडित केर कचरा टाकला नाही.

५. एकूण ............ दिवस आंघोळ केली नाही.

### ५.२) निष्पत्ती मुल्यमापन :-

प्रक्रियांमध्ये यश आले असल्यास परिणाम दिसायला सुरूवात होईल. त्यातले काही बिंदु खालीलप्रमाणे असू शकतात.

मागील महिन्यात .................. मुलांना डायरिया झाला होता. आता .............. मुलांना झाला. हळू हळू डायरियाचे प्रमाण शून्यावर येईल हे ध्यानात ठेवावे, पावसाळयाच्या सुरूवातीस डायरियाचे प्रमाण अधिक असते. अर्थात ते पण शून्यावर आणता येते. तथापि दोन महिन्याच्या डायरियाच्या प्रमाणाची तुलना न करता मागील वर्षाच्या त्याच महिन्याशी तुलना करणे योग्य राहील.

मागील महिन्यात .............. मुलांना खरुज होती ती आता ........... मुलांना झाली. हळू हळू खरुजेचे प्रमाण शून्यावर येईल.

मागील महिन्यात .............. मुलांना ताप, खोकला, सर्दी झाली होती. आता ............ मुलांना हा त्रास झाला. यासाठी उबदार कपडे इत्यादींची सुध्दा माहिती द्यावी.

मागील महिन्यात आजारपणामुळे एकूण ................... मूले दिवस गैरहजर होती. ती आता ....... मुले दिवस राहिली. (मनुष्य दिवसाच्या धर्तीवर मुले दिवस असा शब्द वापरला आहे.)

६. शासनास माहित आहे की, ग्रामीण व शहरी दोन्ही भागात बऱ्याच लोकांनी अजून स्वत:चे शौचालय बांधलेले नाहीत. त्यांना पैशाची किंवा जागेची अडचण असेल. प्रत्येक कुटूंब शौचालय बांधत नाही, तोपर्यंत मित्रांच्या/ शेजाऱ्यांचे/ नातेवाईकांच्या घराचे शौचालय किंवा सार्वजनिक शौचालय वापरावे. हळू हळू सर्व कुटुंबाने स्वत:चे शौचालय बांधावे. त्यास काही महिने किंवा वर्षे लागू शकतील. परंतु अनंतकाळपर्यंत राज्यातील मुले किंवा माणसे उघडयावर शौचास जातील हे मुळीच मान्य नाही. येत्या काही वर्षात आपल्या शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाच्या घरी शौचालय बांधले जाईल हे उद्दिष्ट ठरविण्यात यावे. यासाठी किती वर्षे लागतील हे मुलांशी/पालकांशी बोलून ठरवावे. मात्र शिक्षकांनी स्वत: शौचालय बांधण्याचे काम करू नये. आपल्या शिक्षणामुळे प्रत्येक कुंटुंब शौचालय बांधेल याची काळजी घ्यावी.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याकरिता राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेमार्फत उपलब्ध निधीचा विनियोग व्यवस्थित

करुन व आयुक्त, शिक्षण यांनी आपले यंत्रणेमार्फत पाठपुरावा करुन याबाबतचा अहवाल ऑक्टोंबर अखेरीस व त्यानंतर दर दोन महिन्यानी शासनास सादर करावा.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१००७१७३९३८१५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2015.10.08 17:15:31 +05'30'

**(रा.ग.गुंजाळ)**
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मंत्री (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई,
३) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४) आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय,
५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
६) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
७) शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) आयुक्त महानगरपालिका (सर्व),
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
११) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व जिल्हे,
१३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर),जिल्हा परिषद (सर्व),
१४) शिक्षणाधिकारी/शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१५) निवड नस्ती (एस.डी.४) कार्यासन.

## परिशिष्ट “अ”

स्वच्छतेची व्याप्ती व विषय लक्षात घेऊन उपक्रमांचे आयोजन करावे. उदाहरणदाखल काही उपक्रम नमूद केले आहे.

- वर्गात स्वच्छतेचे तक्ते लावणे
- विद्यार्थ्यांकडून परिसर स्वच्छतेनुसार उपक्रम /प्रकल्प तयार करून घेणे
- पालकांना व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व समजून सांगण्यासाठी संगणकावर फिल्म / क्लीप दाखवणे
- "स्वच्छता" विषयावर आधारित निबंध, वकृत्व-वादविवाद स्पर्धा घेणे
- स्वच्छ/अस्वच्छ जागांचे तुलनात्मक तक्ते दाखवून चर्चात्मक कार्यक्रमांचे आयोजन करणे
- रोगराईला दूर सारणे
- स्वच्छतेची कास धरणे
- अशा प्रकारच्या घोषवाक्यांची मालिका तयार करणे

"स्वच्छता" हे एक महिन्यापुरते करण्याची मोहिम नसून ती अंगी बाणण्याची सवय आहे. ती सवय विद्यार्थ्यांमध्ये रूजवण्याचा ध्यास धरूया, महाराष्ट्र स्वच्छ करुया.